RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# क्वचिदपि कुमाता न भवति।

डॉ. सौ. पौर्णिमा चंद्रकांत मोटे
छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा.

## गोषवारा

कैकेयीची 'सावत्र, दुष्टमाता' अशी रामायणातील प्रतिमा आबालवृद्धांच्या मनात कोरलेली आहे. भरताला अयोध्येची राज्यगादी देऊन, रामाला मात्र चौदा वर्षे वनवासाला पाठविणारी कैकेयीची प्रतिमा जनमानसात दिसून येते.

परंतु संस्कृत कवी भासलिखित 'प्रतिमा' हे नाटक, कालिदासलिखित 'रघुवंशम्' हे महाकाव्य अभ्यासल्यानंतर तिची ही प्रतिमा दूर होते. प्रस्तुत कवींच्या लेखनाच्या आधारे कैकेयीच्या मातृत्वाचे यथार्थ स्वरूप, तिच्या वर्तनामागील भूमिका या शोधनिबंधात मांडणार आहे. माता–अपत्य अशी नात्याची दुहेरी गुंफण जाणून राम–लक्ष्मण–भरत या पुत्रांची कैकेयी मातेविषयीची भूमिकाही प्रस्तुत करणार आहे. कैकेयीचे मातृत्व 'क्वचितपि कुमाता न भवति।' या उद्गारांची सार्थकता व्यक्त करणारे आहे. आजच्या समाजव्यवस्थेतही मननीय अशा स्वरूपाचे कैकेयीचे रेखाटन, निश्चितपणे माता–अपत्य यांच्या नात्याला दृढता देणारे आहे.

## संशोधन पद्धती

'क्वचिदपि कुमाता न भवति।' या शीर्षकाच्या अंतर्गत कैकेयीचे व्यक्तिरेखाटन करीत असताना वर्णनात्मक व तुलनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केलेला आहे.

बीजशब्द : माता, पुत्र, कैकेयी, राम, लक्ष्मण, भरत, प्रतिमा

## प्रास्ताविक

स्त्री–पुरूषांच्या मीलन सोहळयाचे फल म्हणजे अपत्य. त्यामुळे स्त्रीला मातृत्वपदाची प्राप्ती होते. कन्या किंवा पुत्र असलेल्या अपत्याच्या बाबतीत माता या नात्याने तिचे विशेष असे वर्तन घडत असते. ती त्यासाठी कष्ट घेते, त्याग करते. हे करत असताना अपत्याविषयीच्या तिच्या प्रेम, वात्सल्यादी भावना व्यक्त होतात. या नात्यामुळे तिच्या वाटयाला केव्हा गौरव येतो, तर क्वचित तिरस्कारासारख्या विपरीत गोष्टींनाही सामोरे जावे लागते. अशा स्थितीतही मातृत्वाची श्रेष्ठता अबाधित राहते. मातेची भूमिका ही जशी अपत्याच्या बाबतीत महत्त्वाची मानली जाते, तशी अपत्याचीही मातेबाबतची काही कर्तव्ये, भावना या महत्त्वाच्या ठरतात. या दुहेरी नातेसंबंधातूनच मातृत्वाचे विश्व साकारते.

आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रीरूपातील मातेची प्रशंसा ही अगदी प्राचीन काळापासून व्यक्त झालेली दिसते. स्मृतिग्रंथांमध्ये मातेविषयी प्रशंसा करून तिच्याविषयी आदरभाव, पूज्यभाव व्यक्त केलेला दिसतो. पित्याहूनही तिची श्रेष्ठता प्रतिपादन केलेली दिसते. वसिष्ठस्मृतीमध्ये म्हटले आहे, 'माता पतित झाली तरी पुत्राला ती केव्हाच बहिष्कृत असू शकत नाही.' मनूनेही म्हटले आहे–'सहस्त्रं तु पितॄन् माता गौरवेणातिरिच्यते।।' (मनु. 2.145) याचा अर्थ मातेची योग्यता पित्याच्या सहस्त्रपटींहून अधिक असते.

महाभारतामध्ये 'मातेपेक्षा श्रेष्ठ गुरू कोणी नसतो', असे म्हटले आहे. शंकराचार्यांनी मातेविषयीचा दृढ विश्वास व्यक्त करताना म्हटले आहे– 'कुपुत्रो जायेत् क्वचिदपि कुमाता न भवति।' – एखादया वेळेस मुलगा वाईट निपजेल, परंतु आई मुलाच्या बाबतीत वाईट झाली, असे केव्हाही घडणार नाही.

एकूण मातेविषयी प्रशंसा, दृढ विश्वास व्यक्त केला जात असताना भासाच्या 'प्रतिमा' नाटकामध्ये आणि कालिदासाच्या रघुवंशम् या महाकाव्यात माता कैकेयीविषयीचे चित्र कशा प्रकारचे आढळते, त्यासंबंधीचे विचार या प्रकरणात मांडणार आहे. तसेच, तुलनात्मक दृष्टिकोणही व्यक्त करणार आहे.

## माता कैकेयी व पुत्र

वाल्मींकिंच्या रामायणात, भासाच्या प्रतिमा नाटकात आणि कालिदासाच्या रघुवंश या महाकाव्यात कैकेयीचे व्यक्तिरेखाटन आले आहे. एकच पात्र, पण त्याच्या मांडणीतील फरकामुळे जनमानसात त्याचे प्रतिबिंब किती भिन्न प्रभाव निर्माण करते, हे या सर्व रेखाटनांच्या शैलीतून प्रत्ययास येते.

रामायणाशी संबंधित असे हे कैकेयीचे पात्र आहे. रामाच्या ऐन राज्याभिषेकाच्या प्रसंगी तिने दशरथाकडे वरांची केलेली मागणी हा वाल्मीकि–रामायणातील प्रसंग म्हणजे भास आणि कालिदास यांच्या वर्णनामध्ये आढळणारा समान धागा होय. रामायणानुसार आपला पुत्र भरत याला अयोध्येचे राज्य मिळावे, या स्वार्थी उद्देशाने ती दशरथाकडे वरांची मागणी करते. तसेच तिने मागितलेल्या दुसऱ्या वरामुळे रामाला चौदा वर्षे एवढया दीर्घकालीन वनवासाला सामोरे जावे लागते. पुत्रवियोगाच्या आघाताने दशरथाचा मृत्यू होतो. आजोळाहून परतलेल्या भरताला माता कैकेयीचे हे वागणे पसंत पडत नाही. तिच्या या दुर्व्यवहारामुळे भरत तिला दोष देतो, तिचा

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

तिरस्कार करतो. याप्रमाणे रामायणात कैकेयीला सर्व अनर्थांचे मूळ मानले आहे. तिची दुष्ट, लोभी, स्वार्थी अशी मातृत्वाची प्रतिमा आबालवृद्धांच्या मनात ठसलेली आहे. स्वतःच्या पुत्रावरील प्रेमाला आलेले विकारी रूप हे येथे प्रकर्षाने जाणवते.

रामायणातील भरताप्रमाणेच रघुवंशातील भरत हा कैकेयीच्या दुर्वर्तनामुळे मातेचा तिरस्कार करतो. आपल्या पित्याच्या मृत्यूबाबतची बातमी कळल्यावर स्वतःच्या मातेचाही त्याग करतो. राज्यलक्ष्मीचा स्वीकार न करता नंदिग्राममध्ये राहून राज्यकारभार पाहतो. (सं. डॉ. ब्रह्मानंद त्रिपाठी, कालिदास–ग्रन्थावली, वाराणसी, चौखम्बा सुरभारती प्रकाशन, पुनर्मुद्रित संस्करण 2002 ई. रघुवंशम् 12.14) कैकेयीने पातक केल्याची भावना मनामध्ये बाळगून स्वतः त्यासाठी प्रायश्चित घेतो. तिच्याविषयीचा निषेध स्वतःच्या कृतीतून व्यक्त करतो. बंधू रामावरील प्रेमापोटी त्याने आपल्या मातेबाबतीत अशी कठोर भूमिका घेतलेली दिसते. कालिदासाने तिला 'क्रूरनिश्चया', (पूर्वोक्त कालिदास–ग्रन्थावली, रघुवंशम् 10.4) 'चण्डी' (पूर्वोक्त कालिदास–ग्रन्थावली, रघुवंशम् 10.5) ही विशेषणे लावली आहेत. एकंदरीत कालिदासाने मातेला पातकी मानून तिचा तिरस्कार करणारा पुत्र भरत रेखाटला आहे.

कैकेयीची रामायणातील ही दुष्ट प्रतिमा बदलून टाकण्यास भास 'प्रतिमा' या नाटकात यशस्वी झाला आहे. सावत्र माता दुष्ट असेल तर ती कैकेयीसारखीच असे वर्णन करून दुष्टत्वादी दुर्गुणांची जी मोहोर तिच्यावर रामायणाने लावली होती, ती भासाने पूर्णपणे पुसून टाकली आहे. पत्नी आणि माता या दोन नात्यांची जबाबदारी पेलत असताना तिने मातृत्वाच्या कर्तव्याला अग्रक्रम दिलेला आहे. कठीण प्रसंगामध्ये निर्णय घेण्याची तिची बौद्धिक क्षमताही प्रशंसनीय आहे. कैकेयीने केलेल्या वरांच्या मागणीपाठीमागील भूमिका भासाने स्पष्ट केली आहे. या पार्श्वभूमीवर 'माता' या नात्याने तिचे मुलांबाबतचे वर्तन पाहावयाचे आहे. तिची भूमिका अभ्यासावयाची आहे. याबरोबरच राम, लक्ष्मण, भरत यांची ती माता होय. पुत्र या नात्याने त्यांच्या मातेविषयी कोणत्या भाव–भावना आहेत त्या प्रस्तुत ठिकाणी पाहावयाच्या आहेत.

भासाच्या 'प्रतिमा' नाटकात मातुलगृहाहून परतलेला भरत प्रतिमागृहात आल्यानंतर त्याला कैकेयीच्या स्त्रीशुल्काच्या मागणीमुळे घडलेल्या घटना समजतात. आपल्या जन्मदात्रीविषयी त्याच्या रोमारोमात तिरस्कार, द्वेषादी भावना भरलेल्या दिसतात. (पूर्वोक्त कालिदास–ग्रन्थावली, रघुवंशम् 3.16) तिला स्वतःची माता मानण्यास किंवा संबोधिण्यास देखील तो नकार देतो. (पूर्वोक्त कालिदास–ग्रन्थावली, रघुवंशम् 3.18) तो तिच्या दुष्कृत्यांचा पाढा वाचतो. (आचार्य श्रीरामचंद्र मिश्र, 'प्रतिमा–नाटकम्', वाराणसी, चौखम्बा संस्कृत सीरीज आफिस, दशम संस्करण 1999) 'कष्टं कृतं भवत्या' असे म्हणून तिला दोषी ठरवितो. 'राज्यलोभी कैकेयीपुत्र भरत' म्हणून स्वतःची ओळख करून देतो. (पूर्वोक्त प्रतिमा–नाटकम्, अंक 4, पृष्ठ 103)

स्त्रीशुल्काची मागणी आपण कोणत्या कारणास्तव केली, हे कैकेयी भरताला परोपरीने सांगण्याचा प्रयत्न करते. आपल्या कृतीचे स्पष्टीकरण देताना दशरथाच्या सत्यवचनाच्या रक्षणासाठी आपण असे केल्याचे सांगते. भरत ऐकत नाही, असे दिसल्यावर 'देशकाले निवेदयामि' (पूर्वोक्त प्रतिमा–नाटकम्, अंक 2, पृष्ठ 95) म्हणते. रामराज्याभिषेकप्रसंगी कैकेयी अनपेक्षितपणे स्त्रीशुल्काची जी मागणी करते व त्याचा परिणाम म्हणून ज्या घटना घडतात, त्या विविध प्रसंगांच्या रेखाटनात भासाने कैकेयीच्या वर्तनाचे समर्थन केले आहे. किंबहुना तिला निर्दोष ठरविले आहे.

शापाप्रमाणे दशरथाचा मृत्यू घडणार, हे निश्चित होते. परंतु त्याला कारण असलेला पुत्रविरह, हा पुत्राच्या मृत्यूने न येता, अन्य कोणत्यातरी कारणाने व्हावा, यासाठी कैकेयीने येथे आपली बुद्धी पणाला लावलेली दिसते. अत्यंत चातुर्याने कैकेयीने विचार केला, की पुत्रविरह हा पुत्रमृत्यूने घडून येण्याऐवजी पुत्रवियोगाने घडावा. यासाठी ती रामाच्या वनवासगमनाचा पर्याय निवडते. गो. के. भट म्हणतात (गो. के. भट, 'संस्कृत नाटके आणि नाटककार', पुणे, श्रीविद्या प्रकाशन, दामोदर दि. कुलकर्णी, प्रथम आवृत्ती 1980), 'कैकेयीने केलेल्या वनवासाच्या मागणीच्या मुळाशी मोठी आपत्ती टाळून कमी आपत्ती स्वीकारावी (Choosing the lesser evil) हा विचार आहे.' भासाने येथे कैकेयीच्या व्यक्तिमत्त्वाचा पैलू रेखाटला आहे, तो अतिशय वेगळा आहे. अतिशय कठीण प्रसंगात तिने हा जो निर्णय घेतलेला आहे, तो तिच्या बुद्धिमत्तेची चमक दाखविणारा आहे. त्यामुळे गो. के. भटांचे प्रस्तुत मत हे युक्त आहे.

या सर्व खटाटोपात कैकेयी एक माता म्हणून पुत्र भरताच्या नजरेतून उतरलेली दिसते. भरत वेळोवेळी तिची हेटाळणी करतो. मात्र याबद्दल कैकेयी त्याच्यावर नाराज होऊन अपशब्द बोलत नाही. तिची भासाने रेखाटलेली स्थितप्रज्ञतेची वृत्ती तिच्या मनाचा खंबीरपणा दर्शविते. योग्य वेळी सर्व बाबी उघड करू, असा विचार ती करते. एकीकडे माता म्हणून भरताच्या अशा वागण्याने, त्याच्या दुरावण्याने ती अंतःकरणात निश्चितच दुःखी झाली असेल, किंबहुना होरपळलीही असेल. दुसरीकडे पतिवियोगाच्या पूर्वकल्पनेने वैधव्याची कुऱ्हाड कोसळणार या दुःखाने कोलमडून गेली असेल. पण या सर्व संकटाच्या रणधुमाळीत तिने अतिशय धैर्याने, विवेकाने परिस्थितीचा सामना केलेला दिसतो. दशरथाच्या मृत्यूनंतर भरताने तिची उपरोधिकपणे केलेली हेटाळणी ती निमूटपणे सहन करते. त्याच्याबाबत कोणतीही अनुचित भूमिका ती घेत नाही. 'क्वचिदपि कुमाता न भवेत्।' हेच या पाठीमागील कारण असेल!

'रामभार्या हरण केली गेली, त्यामुळे तुझे मनोरथ पूर्ण झाले' असे कैकेयीला उद्देशून भरत म्हणतो. याप्रमाणे तो पुन्हा दोषारोपण करतो. तेव्हा आता निश्चितच भरताला सविस्तर वस्तुस्थिती सांगण्याची वेळ आली असे तिला वाटते. 'महर्षींनी दशरथाला

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

पुत्रवियोगाचा शाप दिला होता. तो अपरिहार्य होता. तो टाळण्यासाठी रामाला वनवासास पाठविले, राज्यलोभाने नव्हे. याशिवाय मातुलगृही असलेल्या तुझ्या वियोगाची सवय होती. त्यामुळे रामाला पाठविणे भाग पडले. दुःखविह्वलतेमुळे चौदा दिवसांऐवजी चौदा वर्षे चुकून म्हटले. (पूर्वोक्त प्रतिमा–नाटकम्, अंक 6, पृष्ठ 163,165) याप्रमाणे कैकेयी आपल्या वर्तनातील सत्यता सांगते. आपले निरपराधित्व दाखवून देते.

कैकेयीच्या पाठोपाठ सुमंत्र देखील तिची बाजू घेतो आणि वामदेवादींना हे माहीत होते, त्यांची अनुमती होती, असे सांगतो.

कैकेयीने जे काही समर्थन केले, त्याला देखील भासाने मानसशास्त्रीय आधार दिलेला आहे. जेव्हा व्यक्ती एखाद्या विलक्षण मानसिक दडपणाखाली असते, तेव्हा चौदा दिवसांऐवजी चौदा वर्षे तोंडातून उच्चारणे स्वाभविक घडू शकते. भासाने इथेही कैकेयीचे निर्दोष म्हणून रेखाटन केले आहे.

मातेच्या वर्तनाचे रहस्य उलगडल्यावर भरतही आपली माता अपराधी नाही या भावनेने, विचाराने आनंदित होतो, 'भ्रातृप्रेमाने क्रोध उत्पन्न झाला व त्यामुळे ती तुला दूषणे दिली', असे अगदी प्रांजळपणे कैकेयीला सांगतो. तिची क्षमा मागतो. तिला अभिवादन करतो. (पूर्वोक्त प्रतिमा–नाटकम्, अंक 6, पृष्ठ 166) 'माता' म्हणून नाकारणार भरत तिला आनंदाने माता म्हणून स्वीकारताना दिसतो. इतकेच नव्हे तर तिच्याविषयीचा सार्थ अभिमानही व्यक्त करताना दिसतो. मुलांकडून मातेची यापेक्षा अधिक अपेक्षा नसते. मातृत्वाचा गौरव हा पुत्राच्या प्राप्तीनेच साधला जातो. हरवले ते गवसले या वृत्तीने कैकेयीला झालेला आनंद हा शब्दातीत होता. त्यामुळे कैकेयी म्हणते, 'का नाम माता पुत्रकस्यापराधं न मर्षयति ?' पूर्वी हेटाळणी सहन करताना तिचा जो काही मानसिक कोंडमारा झाला असेल, त्यावरील सर्व मळभ भरताजवळ दूर झाल्याने कैकेयी निश्चिंत झालेली दिसते. 'को ऽत्र दोषः' असे भरताला उद्देशून म्हणत असता तिच्या मनाचा मोठेपणाही व्यक्त होतो. पुत्राने सतत केलेला तिरस्कार, दिलेला दोष हे सगळे विसरून कैकेयी भरताला माफ करते. त्याचे वर्तन निर्दोष असल्याचे मानते. तिच्या मनाचा मोठेपणा येथे व्यक्त होतो.

भरताप्रमाणे कैकेयी रामावरही निरतिशय प्रेम करत असल्याचे दिसते. रामाच्या आगमनानंतर कैकेयीचे वर्तन हे तिच्या निरपराधित्वाला पुष्टी देणारे असल्याचे जाणवते. तिने सांगितल्याप्रमाणे रामाला वनवासास पाठविण्यामागे खरोखर सद्हेतू असल्याचा प्रत्यय येतो.

राम परत आल्यानंतर भरत त्याला राज्यभार स्वीकारण्याची विनंती करतो. तेव्हा कैकेयी देखील स्वतःचे हे मनोरथ दीर्घकालीन असल्याचे सांगते. (पूर्वोक्त प्रतिमा–नाटकम्, अंक 6, पृष्ठ 178) एवढेच नव्हे तर राज्यभिषेक स्वीकारण्याची आज्ञा देते. त्यानंतर रामाच्या अभिषेकप्रसंगी त्याच्या विजयघोषणांनी आनंदित होते. त्याच्या पुत्रोत्सवाची अभिलाषा बाळगते.(पूर्वोक्त प्रतिमा–नाटकम्, अंक 7, पृष्ठ 183)

याप्रमाणे भरताला राज्यप्राप्ती करून देण्याबाबत कैकेयीचे स्वार्थी मातृत्व आणि रामाला राज्यच्युत करून, त्याचा अधिकार नाहीसा करून दूर वनवासास पाठविण्यामागील तिचा सावत्र मातृभाव हे तिच्या व्यक्तिमत्त्वातील दुष्टपणाचे नेहमीचे चित्र भासाने विशिष्ट काळापर्यंत नाटकामध्ये रहस्य स्वरूपात राखलेले दिसते. मात्र नंतर हे चित्र बदलून 'कैकेयी अशी का वागली' याचे उत्तर अखेरीस देऊन तिला पूर्णपणे निर्दोषत्व देऊ केले आहे. कैकेयीची जनमानसात असलेली नेहमीची दुष्टपणाची प्रतिमा बदलण्यात भास यशस्वी झाल्याचे दिसते.

प्रस्तुत प्रकरणाच्या दृष्टीने विचार करता माता कैकेयी व पुत्र भरत यांच्यातील दुरावा नाहीसा होऊन दोघा माता–पुत्रांचे पुन्हा मनोमीलन झालेले दिसते. पतीच्या सत्यवचनाचे रक्षण करणारी, पुत्रवियोगापेक्षा भर्तृवियोग स्वीकारणारी एक त्यागी व प्रेमळ माता असलेली कैकेयी, स्त्री म्हणून आगळीवेगळी ठरते.

भासाने कैकेयीची जनमानसात नव्याने निर्माण केलेली 'प्रतिमा' या दृष्टीने नाटयाचे नाव सार्थ व्हावे, इतके वेगळेपण भासाने तिच्या व्यक्तिमत्त्वरेखाटनाने साकारले आहे.

गो. के. भट म्हणतात ( पूर्वोक्त डॉ. गो. के. भट, संस्कृत नाटके आणि नाटककार, पृष्ठ 31), 'प्रतिमा नाटकात भासाने रामायण हवे तसे वाकविले आहे. नाट्यशास्त्राचे दंडक जरूर तर झुगारून दिले आहेत. व्यक्तिचित्रणाचे स्वातंत्र्य घेऊन तथाकथित दुष्टांच्यामध्येही माणुसकीची ज्योत तेवत असते, असे दाखविण्याची धिटाई केली आहे.' प्रस्तुतचे मत पटणारे आहे. कैकेयीचे पूर्ण रूपच बदलून, तिचे उदात्तीकरण करून भासाने तिला 'आदर्श माता' म्हणून गौरविले आहे.

कैकेयी आणि भरत या माता–पुत्रांच्या परस्परांविषयीच्या भावना पाहिल्या. यानंतर राम–लक्ष्मण या दोघांच्या कैकेयी मातेविषयीच्या भावना पाहू या.

कैकेयीमुळे दशरथ महाराजांवर संकट आले आहे व रामाने त्याचे निवारण करावे असे कांचुकीय सांगतो. तेव्हा राम त्याचा परिणाम नक्कीच चांगला होईल असा विश्वास व्यक्त करतो. (पूर्वोक्त प्रतिमा–नाटकम्, अंक 1, पृष्ठ 29) रामाने कैकेयीबाबत वारंवार विश्वास व्यक्त केलेला आहे. तिच्या बाबतीत सावत्र माता म्हणून यत्किंचितही किल्मिष त्याच्या ठिकाणी दिसत नाही. राम म्हणतो–

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

'यस्याः शक्रसमो भर्ता मया पुत्रवती च या। फले कस्मिन् स्पृहा तस्या येनाकार्यं करिष्यति।।'(प्रतिमा 1.13)

आपली आई वाईट कार्य करूच शकणार नाही, अशी रामाची ठाम धारणा या ठिकाणी व्यक्त होते.

'कैकेयीच्या सांगण्यावरून रामाचा राज्याभिषेक थांबविण्यात आला', असे कंचुकीने सांगताच, (पूर्वोक्त प्रतिमा–नाटकम्, अंक 1, पृष्ठ 30) 'गुणाः खल्वत्र ' अशी प्रतिक्रिया राम व्यक्त करतो. कंचुकी वारंवार कैकेयीच्या संबंधाने सांगतो, तेव्हा राम 'अतः परं न मातुः परिवादं श्रोतुमिच्छामि।' आता यापुढे कैकेयी–मातेच्या संबंधाने निंदा ऐकण्याची माझी इच्छा नाही – असे स्पष्टपणे त्याला सांगतो.

याउलट लक्ष्मण मात्र दशरथाची मूर्च्छा आणि कैकेयीच्या वर्तनाबद्दल तीव्र संताप व्यक्त करतो, एवढेच नव्हे, तर 'युवतिरहितं लोकं कर्तुं यतश्छलिता वयम्।'' (पूर्वोक्त प्रतिमा–नाटकम्, 1.18) संपूर्ण विश्व स्त्रीशून्य करण्याविषयीचे कठोर उद्‌गार बोलून दाखवितो. लक्ष्मणाचा तिच्याविषयीचा क्रोध, तिरस्कार येथे स्पष्टपणे व्यक्त होतो.

लक्ष्मण क्रोध व्यक्त करत असता राम त्याला शांत करण्याचा प्रयत्न करतो. स्वधनाची मागणी करणाऱ्या मातेवर प्रहार करून मातृवध करणे हे अनुचित असल्याचे राम त्याला सांगतो. (पूर्वोक्त प्रतिमा–नाटकम्, 1.22)

मातेने विवाहप्रसंगीच्या स्त्रीधनाची मागणी करणे हा तिचा अधिकार असल्याचे राम मानतो. तसेच तिच्या न्याय्य मागणीविषयी आपण अनुचित कृत्य करता कामा नये असे रामाला वाटते. या ठिकाणी रामाची कैकेयीविषयीची भूमिका व्यक्त होते.

नाट्याच्या अखेरीस कैकेयी जेव्हा रामाला अभिषेक स्वीकारण्यास सांगते, तेव्हा राम मातेच्या आज्ञेचा स्वीकार करतो.

याप्रमाणे कैकेयीविषयीचे रामाचे मातृप्रेम व्यक्त होते. तिच्या स्त्रीशुल्काच्या मागणीबाबत वा स्वतःचा राज्याभिषेक रद्द होण्याबद्दल कोणत्याही प्रकारे तिला दोषी मानत नाही. कैकेयीच्या नातेसंबंधाने कोणताही अपशब्द ऐकून घ्यावयास तो तयार होत नाही. तिच्याविषयी विश्वासच व्यक्त करतो. लक्ष्मणालाही शांत करतो. वनवासगमन वगैरे सगळया घटना घडून गेल्यानंतरही कोणत्याही प्रकारे मनात किंतु न बाळगता राज्याभिषेकासाठी होकार देतो. (पूर्वोक्त प्रतिमा–नाटकम्, अंक 7, पृष्ठ 179)

याप्रमाणे भासाने त्याच्या नाटकात सावत्र माता कैकेयी आणि सावत्र पुत्र राम यांच्यातील सावत्रपणाचा भाव पूर्णपणे दूर केला आहे. रक्ताचा घनिष्ट भावबंध दर्शविला आहे. त्यातून मातेची श्रेष्ठता व्यक्त केली आहे. याप्रसंगी पुत्राचे मातृप्रेमही व्यक्त झाले आहे. रामायणाहून वेगळया अशा या 'प्रतिमा' रेखाटनात भास निश्चितच यशस्वी झाल्याचे ध्यानात येते.

रघुवंशातील राम आपल्या कृत्याबद्दल तोंड लपविणाऱ्या कैकेयीचे सांत्वन करतो. पिता दशरथाने तोंडाने वर दिला. मात्र कृती काहीच न केल्याने म्हणजचे वचनपूर्ती न केल्याने त्याला पातक लागले असते. माता कैकेयीने केलेली वराची मागणी हे तिचे एकप्रकारे सत्कृत्यच होय असे राम मानतो व तिच्या मनातील लज्जा दूर करतो. (पूर्वोक्त कालिदास–ग्रन्थावली, रघुवंशम् 14.16) तिच्याविषयी आदरभाव व्यक्त करतो. अर्थातच कैकेयीने केलेल्या वराच्या मागणीमुळे उलट पिता उपकृत झाला, अशी कृतज्ञतेची भावना राम व्यक्त करतो.

## निष्कर्ष

दुष्टत्वादी दुर्गुणांनी युक्त, सावत्रमाता कैकेयी अशी रामायणातील रूढ प्रतिमा बदलण्याचा प्रयत्न भास आणि कालिदास या दोहोंनीही त्यांच्या साहित्यात केला आहे. तिच्या व्यक्तिमत्त्वाचे उदात्तीकरण करून मातृत्वाचे उज्ज्वल रेखाटन केले आहे. पत्नी म्हणून कर्तव्यपूर्तीचे तिला श्रेष्ठत्व दिले आहे.

तथापि कालिदासाहून भासाचे वेगळेपण हे की त्याने 'माता' या नात्याने कैकेयीला तिच्या वर्तनामागील भूमिकेची संधी दिली आहे. त्यामुळे माता व पुत्र या दोहोंमधील दुरावा नाहीसा झाला आहे. पुत्रांचा वियोग घडू नये, यासाठी कैकेयीने कायमचा पतिवियोग स्वीकारला आहे; रामाला राज्याभिषेक केला आहे, आपले मातृत्व गौरवास्पद ठरविले आहे.

एकूणच भासादिंनी रेखाटलेल्या वात्सल्यमूर्ती, आदर्शमाता असलेल्या कैकेयीच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू आजच्या समाजव्यवस्थेत आदर्शवत, मननीय अशा स्वरूपाचे आहे. माता–अपत्य या नात्यातील विश्वास वृद्धिंगत आणि दृढ करणारे आहेत.

## संदर्भग्रंथ सूची

1. संपादक डॉ. ब्रह्मानंद त्रिपाठी, कालिदास–ग्रन्थावली, वाराणसी, चौखम्बा सुरभारती प्रकाशन, पुनर्मुद्रित संस्करण 2002 ई..
2. 'आचार्य श्रीरामचन्द्र मिश्र, प्रतिमा–नाटकम्, वाराणसी, चौखम्बा संस्कृत सीरीज आफिस, दशम संस्करण 1999.
3. गो. के. भट, संस्कृत नाटके आणि नाटककार, पुणे, दामोदर दि. कुलकर्णी, श्रीविद्या प्रकाशन, प्रथम आवृत्ती 1980.